## नवी मुंबई महानगरपालिका

महापालिका सचिव कार्यालय,
बेलापूर भवन, ८ वा मजला,
सी.बी.डी., बेलापूर,
नवी मुंबई - ४०० ६१४.
दिनांक ०३ फेब्रुवारी २०१४.

### -: सर्वसाधारण सभेची पुरवणी नोटीस :-

नवी मुंबई महानगरपालिकेच्या **शुक्रवार, दिनांक ०७ फेब्रुवारी २०१४ रोजी सकाळी ११.०० वाजता भरणा-या फेब्रुवारी महिन्याच्या सर्वसाधारण सभेमध्ये पुढील जादा विषय क्र. ३५ व ३६** विचारात घेण्यासाठी प्रसृत करण्यात येत आहेत.

**मा. महापौरांच्या आदेशावरुन,**
**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**महानगरपालिका सचिव(प्र.),**
**नवी मुंबई महानगरपालिका.**

---

**३५ व ३६. श्री. विनित मोतीराम पालकर, यांजकडून :-**

(३५) दिनांक ११ मे २०१२ रोजीच्या मा. महासभेमध्ये मा. महापौर सो. यांच्या सुचनेनुसार ११ मे २०१२ पर्यंतच्या अनधिकृत घरांना नियमित करण्यासाठी सुचना मांडली होती त्यास खुप अवधी होऊन गेला असुन तद्नंतर नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये मोठया प्रमाणावर गरजेपोटी बांधकामे झालेली आहेत अनेक गावातील लोकांनी गरजेपोटी अनधिकृत बांधकाम केलेले आहे. नवी मुंबई गावठाण विस्तार क्षेत्रातील ज्या घरांना ३१ डिसेंबर २०१३ पर्यंत घरपट्टी मिळाली असेल अशा घरपट्टीधारक घरांना (अनधिकृत बांधकामांना) पुर्नविकासामध्ये नियमित करावे. (३६) नवी मुंबई क्षेत्रातील घरे ही सिडकोने बांधलेली असुन तेथे राहणारे नागरिक हे अल्पउत्पन्न गटातील कुटुंबे असुन त्यांच्या कुटुंबातील सदस्यांच्या संख्येमध्ये वाढ झाल्यामुळे त्यांनी एलआयजी भागामध्ये गरजेपोटी अनधिकृत वाढीव बांधकाम केले आहे. अशा कुटुंबाची आर्थिक स्थिती बेताची असल्यामुळे ते नवीन घर घेवून राहू शकत नाहीत. तरी ज्यांनी गरजेपोटी अनधिकृत वाढीव बांधकाम केलेले आहे अशा सर्व ३१ डिसेंबर २०१३ पर्यंतच्या घरपट्टीधारक अनधिकृत बांधकामाना पुर्नविकासामध्ये नियमित करुन घ्यावे.